30-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/29/2025 11:41 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



सात दिवस उलटूनही फेरी बोट बुडालेलीच !

पान ३ वर



स्मृती मंधानाचा ऐतिहासिक पराक्रम

पान ४ वर

वेर्णा, सोमवार, ३० जून २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 298 I Verna, I facebook.com/dainikherald I Monday 30 June 2025 I Pages 4 I ₹ 4

## निवडक

### एका मिनिटाला साठ भाविकांना मिळणार विठुरायाचे दर्शन

**सोलापूर, दि. २९ :** पावसाची अपेक्षित दणकेबाज सुरुवात... शेतीची सर्व कामे आटोपलेली... मनात विठुरायाच्या दर्शनाची आस... प्रथेप्रमाणे पंढरीस वारी पोहोच करण्याची पिढ्यानंपिढ्याची परंपरा... अशा सर्व सकारात्मकतेमुळे यंदा आषाढी यात्र सुमारे २२ ते २५ लाख भरेल, असा अंदाज पंढरपुरात व्यक्त होत आहे. या दरम्यान, प्रत्येक मिनिटाला सुमारे साठ भाविकांना विठुरायाचे दर्शन होईल. अशा पद्धतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने नियोजन केले आहे.

आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा ६ जुलै रोजी साजरा होत आहे. गतवर्षीपेक्षा यावर्षी यात्रा मोठी भरण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासन भाविकांना अत्यावश्यक सेवा सुविधा पुरविण्यासाठी तयारी सुरू आहे.

सध्या मंदिर समितीकडून तिरुपती बालाजीच्या धर्तीवर टोकन दर्शन पास देऊन भाविकांना जलद दर्शन देण्याची व्यवस्था सुरू केली आहे. टोकन दर्शनाची चाचणी घेण्यात येत आहे. १८०० भाविकांना दररोज टोकन पास दर्शन मिळत आहे. मात्र, आषाढी यात्रा कालावधीत भाविकांची दर्शन रांगेतील गर्दी विचारात घेता टोकन दर्शन चाचणी थांबवण्यात येणार आहे.

### भारताचा पाकिस्तानला आणखी एक दणका

**नवी दिल्ली, दि. २८:** भारताने पाकिस्तानला आणखी एक दणका दिला आहे. जम्मू आणि काश्मीरमधील किशनगंगा आणि रॅटले जलविद्युत प्रकल्पांशी संबंधित असलेला लवाद न्यायाधिकरणाचा निर्णय भारत सरकारने नाकारला आहे. हे ट्रिब्युनल १९६० च्या सिंधू पाणी करारांतर्गत स्थापन करण्यात आले होते. आता भारताने हे ट्रिब्युनल बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. सरकारने सांगितले की, या न्यायाधिकरणाच्या कोणत्याही निर्णयाला कायदेशीर मान्यता नाही.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हा सिंधू जल करार स्थगित केला होता. भारत सरकारने ट्रिब्युनलबाबत एक निवेदन जारी केले असून त्यात म्हटले की, या न्यायाधिकरणाची स्थापना स्वतःच सिंधू पाणी कराराच्या नियमांचे उल्लंघन आहे. भारताने याला कधीही मान्यता दिलेली नाही, त्यामुळे या ट्रिब्युनलचा निर्णय बेकायदेशीर आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवाद पूर्णपणे थांबवत नाही तोपर्यंत आम्ही कराराचे नियम पाळणार नाहीत.' यामुळे पाकिस्तानला दणका बसला आहे. भारताने यावर बोलताना पाकिस्तानवर गंभीर आरोप केला आहे. भारताने म्हटले की, दहशतवादाबाबतची आपली जबाबदारी टाळण्यासाठी पाकिस्तानने केलेली ही एक युक्ती आहे. ही लवाद प्रक्रिया पाकिस्तानच्या जुन्या धोरणाचा भाग आहे. पाकिस्तान नेहमी आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर याचा गैरवापर करते.' भारताने पुढे बोलताना म्हटले की, कोणताही बेकायदेशीर ट्रिब्युनल देशाच्या सार्वभौमत्वासाठी घेतलेल्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. पाकिस्तानचा हा प्रयत्न आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन आहे. भारत राष्ट्रीय सुरक्षा जपण्यासाठी आणि आपल्या हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल. देशाच्या सार्वभौमत्वाशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. त्याचबरोबर भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाला पाकिस्तान आणि दहशतवादाविरोधात एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. तसेच भारताने हेही सांगितले आहे की, भारत कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली येणार नाही आणि विकासाच्या मार्गावर पुढे जात राहील.

लवाद न्यायाधिकरण ज्याला लवाद आयोग, लवाद समिती किंवा लवाद परिषद असेही म्हणतात. हे न्यायाधीशांचे एक पॅनेल आहे ज्यांना कोणत्याही प्रकारचा वाद सोडवण्यासाठी बोलावले जाते. परंतु या कराराशी संबंधित मुद्दा हा भारत आणि पाकिस्तानमधील द्विपक्षीय मुद्दा आहे, यामध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाचे मत ऐकले जाणार नाही असं भारताने ठणकावून सांगितले आहे.

# एटीएम मधून पैसे काढताय? : सावधान !

## वास्को एटीएम कार्ड स्वॅप प्रकरणात नवा खुलासा : लक्ष विचलित करून आरोपींनी लुटले लाखो रुपये

■ टीम दैनिक हेराल्ड :

**वास्को, दि. २९ : एटीएम कार्ड स्वॅप फसवणूक प्रकरणात डिचोली पोलिसांनी अटक केलेल्या टोळीचा आणखी तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये हात असल्याचे उघड झाले आहे. यामध्ये दोन गुन्हे वास्को पोलिस ठाण्यात आणि एक म्हापसा पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आला आहे. या टोळीने 'मदतीच्या' बहाण्याने एटीएम मध्ये ग्राहकांची फसवणूक करत कार्डांची अदलाबदल केली आणि त्यानंतर लाखों रुपयांचे व्यवहार केले, असे तपासातून स्पष्ट झाले आहे.**

### एटीएममध्ये जाण्यापूर्वी घ्यावयाची काळजी

- **पिन लक्षात ठेवा, लिहून ठेवू नका: पिन क्रमांक कोणी विचारले तरी देऊ नका, अगदी जवळच्या व्यक्तीलाही नाही.**
- **कार्ड तयार ठेवा: एटीएमजवळ पोहोचल्यावर कार्ड शोधण्यात वेळ घालवू नका. गोंधळ टाळा.**
- **सुरक्षित ठिकाणीच एटीएम निवडा: गर्दी असलेल्या ठिकाणी असलेले एटीएमच वापरा. एकटे, अंधारात किंवा संशयास्पद ठिकाणी असलेली एटीएम टाळावीत.**
- **अनोळखी व्यक्तींकडून मदत घेऊ नका:काही लोक मदतीच्या बहाण्याने तुमची माहिती घेण्याचा प्रयत्न करू शकतात. गरज भासल्यास थेट बँकेशी संपर्क साधा**

पहिल्या प्रकरणात, वास्को येथील एटीएम मध्ये मेरशी मधील वड्डी येथील रहिवासी भास्कर लोटलीकर (६४) यांना मदतीच्या बहाण्याने गाठण्यात आले. आरोपीने त्यांच्या पत्नीचे कार्ड दुसऱ्या कार्डने बदलले आणि त्यानंतर दोन अनधिकृत व्यवहार करत ५७ हजार रुपये काढले.

दुसऱ्या घटनेत, वास्कोतील मेस्तवाडा येथील दुर्गाप्पा मदार (३०) यांच्याशी आरोपीने अशाच प्रकारे संवाद साधला आणि त्यांचे एटीएम कार्ड बदलून १० हजार रुपयांचे तीन व्यवहार करत ३० हजार रुपये लंपास केले.

दरम्यान, म्हापसा पोलिस ठाण्यात शुक्रवारी नोंदवलेल्या तिसऱ्या गुन्ह्यात ही टोळी पुन्हा सक्रिय असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात उक्षी येथील रॉफिन जे. फर्नांडिस यांचे लक्ष विचलित करून आरोपींनी त्यांच्या खात्यातून तब्बल १ लाख ४१ हजार ५०० रुपये काढले. या फसवणुकीत माडेल-थिवी येथील रेश्मा राजसाब सुलकड, कुचेली येथील दिव्या दिगंबर महेकर आणि इतर व्यक्तींना देखील फटका बसल्याचा संशय आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक उत्क्रांतराव देसाई करत असून, पीआय निखिल पालेकर यांचे मार्गदर्शन त्यांना लाभत आहे. पोलिसांनी नागरिकांना एटीएम वापरताना अज्ञात व्यक्तींकडून 'मदत' घेण्यास टाळावे, तसेच कोणालाही कार्ड किंवा पिन शेअर करू नये, असा इशारा दिला आहे. यापुढे अशी फसवणूक टाळण्यासाठी जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे.






# पेडणे, कांदोळी येथील व्हिला प्रकल्पांची पर्यावरण मंजुरी नाकारली

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २९ :** गोवा राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने पेडणे तालुक्यातील चोपडे आणि बार्देश तालुक्यातील कांदोळी येथील निवासी व्हिला प्रकल्पांसाठी सादर करण्यात आलेल्या पर्यावरणीय मंजुरीच्या प्रस्तावांना स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. प्रकल्पांच्या तपशिलांमध्ये आढळलेल्या गंभीर त्रुटी आणि नियमांतील विसंगतींचा हवाला देत प्राधिकरणाने ही मंजुरी फेटाळली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चोपडे येथील प्रस्तावित प्रकल्पासाठी प्रारंभी ३०७,५८६ चौ.मी. + ६०० चौ.मी. क्षेत्रफळ दर्शवण्यात आले होते. मात्र, नंतर २७४,९८६ चौ.मी. क्षेत्रफळासह सुधारित अर्ज सादर करण्यात आला. तथापि, गोवा राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाच्या पुनरावलोकनात असे स्पष्ट झाले की, भूखंडाचे औपचारिक विभाजन अद्याप पूर्ण झालेले नव्हते, आणि प्रस्तावकांनी सादर केलेली माहिती ही विद्यमान पर्यावरणीय आणि नागरी नियोजन नियमावलीच्या अनुषंगाने सुसंगत नव्हती.

या पार्श्वभूमीवर, गोवा राज्य तज्ज्ञ मूल्यांकन समितीच्या शिफारशींचे पालन करत गोवा राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने या प्रकल्पाच्या पर्यावरण मंजुरीला नकार दिला आहे.



त्याचप्रमाणे, २६,३६५.१२ चौ.मी. प्रस्तावित बांधकाम क्षेत्र असलेल्या कांदोळी गावातील एका निवासी प्रकल्पाच्या मंजुरीचा प्रस्तावही प्राधिकरणाने फेटाळला आहे. या प्रकल्पात वाहनांसाठी स्वतंत्र आपत्कालीन निर्गमन गेटनसल्याचे आढळले. गोवा राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाच्या म्हणण्यानुसार, ही बाब सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे आणि अशा सुविधेअभावी प्रकल्पाला मंजुरी देणे अशक्य होते.

या निर्णयांमधून गोवा राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणा ने राज्यात नियोजित विकास प्रकल्पांसाठी कठोर पर्यावरणीय आणि नियामक निकषांचे पालन अनिवार्य असल्याचा संदेश दिला आहे. केवळ प्रकल्पाचे आर्थिक मूल्य किंवा भौगोलिक स्थान न पाहता, पर्यावरणीय शाश्वतता आणि सार्वजनिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असल्याचे या निर्णयांतून स्पष्ट झाले आहे.

# 'ड्रग्ज योगगुरू' चा काणकोणातील गुरु कोण ?

■ *बासुरी देसाई*
*टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २९ :** छत्तीसगड पोलिसांनी स्वयंघोषित 'योगगुरू' तरुण क्रांती अग्रवाल याला अटक करून गांजासह पकडल्यानंतर, गोव्यात त्याने उभारलेल्या संपत्तीच्या स्त्रोतावर नव्याने संशय व्यक्त करण्यात येत आहे. पंधरा वर्षांपूर्वी एका साध्या बॅगेसह पाटणे समुद्रकिनारी दाखल झालेला तरुण, आता योगा रिसॉर्ट्स व रिअल इस्टेट गुंतवणुकीचा उद्योजक कसा बनला हा प्रश्न अधिक गहन होत चालला आहे.

स्थानिकांच्या मते, सुरुवातीला प्रशिक्षक म्हणून काम करणाऱ्या तरुणने काहीच वर्षांत पाटणे समुद्रकिनारी एक भव्य योगा आश्रम-सह-रिसॉर्ट उभारले. त्याने केवळ पाटणेच नव्हे, तर गोव्यातील इतर भागांमध्येही अनेक मालमत्ता खरेदी केल्याचे बोलले जाते. इतकी संपत्ती आणि वाढती प्रभावशक्ती असतानाही, स्थानिक यंत्रणांनी त्याच्या आर्थिक स्त्रोतांची चौकशी करण्यासाठी कोणताही ठोस प्रयत्न केल्याचा पुरावा नाही.

काणकोण परिसरातील व्यावसायिकांच्या म्हणण्यानुसार, पाटणेच्या समुद्रकिनारी असलेली महागडी जमीन एका ऑफरच्या माध्यमातून तरुणने मिळवली होती.

### तरुण क्रांती अग्रवालच्या गोव्यातील संपत्तीचे गूढ

अल्पावधीतच हे ठिकाण परदेशी पर्यटकांसाठी योगा डेस्टिनेशन' म्हणून विकसित करण्यात आले. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणात होणारी गुंतवणूक आणि जलद आर्थिक उन्नती यामुळे स्थानिकांमध्ये शंका वाढत होत्या.

हेराल्डने या प्रकरणाची अधिक माहिती मिळवण्यासाठी काणकोण पोलिस निरीक्षक हरीश राऊत देसाई व दक्षिण गोव्याचे पोलीस अधीक्षक टिकमसिंग वर्मा यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रतिसाद मिळालेला नाही.

या भोंदू बाबावर एनडीपीएस कायद्यांतर्गत कारवाई करणाऱ्या डोंगरगड पोलिसांचे निरीक्षक जितेंद्र वर्मा यांनी हेराल्डला सांगितले की, त्याने देशात इतर ठिकाणीही चुकीच्या मार्गाने संपत्ती जमवली आहे का, याची चौकशी आम्ही नक्कीच करू.

या चौकशीत आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. काणकोणातील स्थानिक आणि निवडणूक ड्युटीवरील पोलिस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, तरुणने २०२२ मध्ये गोवा विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी केली होती. तो काही भागांमध्ये राजकीय पोशाखात फिरत होता आणि निवडणुकीची तयारी करत असल्याचे बोलत होता, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

डोंगरगड पोलिसांनीही पुष्टी केली की, कोठडीत असताना तरुणने आमदार होणार' अशी धमकी दिली असून, छत्तीसगडमध्ये पुढील निवडणूक लढवण्याचे संकेतही दिले आहेत.

या प्रकरणामुळे गोव्यातील किनारपट्टी भागांतील गुप्तचर व अंमलबजावणी संस्थांची निष्क्रियता चव्हाट्यावर आली आहे. स्थानिक एजन्सींच्या नजरेसमोर, एका सामान्य प्रशिक्षकाने काणकोण परिसरात संशयास्पद मार्गाने रिअल इस्टेट व पर्यटन व्यवसाय कसा उभारला याची दखल घेतली गेली नाही, ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते.

सध्या तरुण क्रांती अग्रवाल डोंगरगड पोलिस कोठडीत आहे. त्याच्या गोव्यातील मालमत्तांबाबत सखोल चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. योगाच्या नावाखाली सुरू असलेल्या व्यवहारांमागे नक्की काय दडले आहे, हे उघड होण्यासाठी कणखर आणि पारदर्शक तपासाची नितांत गरज आहे.

# दोन टप्प्यांत जातीय जनगणनेचा केंद्राचा निर्णय

- **१ मार्च २०२७ पासून सुरुवात**
- **५७४.८० कोटींची तरतूद**
- **डिजिटल पद्धतीने होणार ऐतिहासिक प्रक्रिया**

**नवी दिल्ली, दि. २९ :**

केंद्र सरकारने अखेर आगामी जनगणनेसंदर्भातील अधिसूचना जारी करत २०२७ मध्ये जातगणनेसह दोन टप्प्यांत जनगणना घेण्याचा निर्णय घेतला आहे. देशाच्या बहुतेक भागांमध्ये १ मार्च २०२७ ही आधारभूत तारीख असणार असून थंड आणि दुर्गम भागांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ पासून ही प्रक्रिया सुरू होणार आहे.

ही जनगणना विशेष आहे कारण स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच सर्व नागरिकांना स्वतःची जात नमूद करण्याचा पर्याय देण्यात येणार आहे. १९३१ नंतर प्रथमच जातीय माहिती अधिकृत जनगणनेचा भाग बनणार असून, ही अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होणार आहे. अनुसूचित



जाती व जमातींबाबतची माहिती पूर्वीपासून घेतली जात होती, मात्र अन्य जातींबाबत माहिती संकलित केली जात नव्हती.

भारतामध्ये दर १० वर्षांनी जनगणना करण्याची परंपरा आहे. २०११ मध्ये शेवटची जनगणना झाली होती, तर २०२१ मध्ये नियोजित जनगणना कोविड-१९ महामारीमुळे पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे तब्बल १६ वर्षांनी आता जनगणना होणार आहे.

केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणारे रजिस्ट्रार जनरल व जनगणना आयुक्त कार्यालय ही जबाबदारी पार पाडते. यंदा ही प्रक्रिया डिजिटल स्वरूपात होणार असून, पहिल्यांदाच डिजिटल माध्यमांतून जनगणना पार पडणार आहे.

गृह मंत्रालयाचे प्रवक्ते यांनी सांगितले की, २०२१ साली सर्व तयारी पूर्ण होती, परंतु कोविडमुळे जनगणना पुढे ढकलावी लागली. कोविडनंतर तातडीने जनगणना घेतलेल्या काही देशांना डेटा गुणवत्तेच्या बाबतीत अडचणी आल्या. त्यामुळे भारताने नियोजनपूर्वक प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.

यंदा सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात जनगणनेसाठी ५७४.८० कोटींची तरतूद करण्यात आली असून, याआधी २०२१-२२ मध्ये ३,७६८ कोटींचा निधी राखण्यात आला होता. मात्र मंत्रालयाने स्पष्ट केले की निधी हे कधीच अडथळा नव्हता.

जनगणना ही देशातील लोकसंख्या, शिक्षण, व्यवसाय, भाषा, धर्म, आणि निवासस्थान यासारख्या बाबींची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया आहे. हा डेटा विकास धोरणे, आरक्षण, कल्याणकारी योजना तयार करताना वापरण्यात येतो.

विशेषतः महिला आरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीत जनगणनेचा डेटा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. महिलांसाठी लोकसभा व विधानसभा जागांमध्ये एकतृतीयांश आरक्षण लागू करण्यासाठी, जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावर सीमांकन करण्यात येणार आहे.

पान २ ▶

# ३.१३ लाख लुटले : कोलकात्यातून एकाला अटक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २९ :** सांताक्रूझ येथील ७१ वर्षीय निवृत्त व्यक्तीला सायबर फसवणुकीच्या घटनेत ३.१३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी जुने गोवा पोलिसांनी कोलकात्यातून सुमन घुघू या आरोपीला अटक केली आहे. ही कारवाई सायबर गुन्ह्यांविरुद्धच्या लढ्यातील एक महत्त्वाची कारवाई ठरली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार सांताक्रूझ येथील रहिवासी असून, त्यांना एका अनोळखी व्यक्तीकडून फोन आला होता. त्या व्यक्तीने स्वतःची ओळख बँक ऑफ बडोदाच्या 'दीपक अग्रवाल' या नावाने दिली व निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी क्रेडिट कार्डवर मोफत शॉपिंग ऑफर असल्याचे सांगितले.

त्यानंतर, व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधून आरोपीने तक्रारदाराला विश्वासात घेतले आणि त्याचा सीव्हीव्ही नंबर व ओटीपी विचारून घेतले. या माहितीचा गैरवापर करून तक्रारदाराच्या बँक खात्यातून एकूण ३ लाख ,१३ हजार इतका अनधिकृत व्यवहार करण्यात आला.

पोलिसांनी तक्रार प्राप्त होताच तपास सुरू केला. फसवणुकीचा पैसा अनेक बँक खात्यांमध्ये ट्रान्सफर करण्यात आला असल्याचे तपासातून समोर आले. आरोपी सुमन घुघू याला सखोल तपास आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोधून काढण्यात आले.

त्यानंतर एक विशेष पथक कोलकात्याला पाठवण्यात आले आणि आरोपीला नेताजी नगर पोलिस स्टेशनमधून ताब्यात घेण्यात आले. त्याला अलीपूर येथील एसीजेएम कोर्टात हजर करण्यात आले, जिथे न्यायालयाने त्याला तीन दिवसांची ट्रान्झिट रिमांड मंजूर केली.

सुमन घुघू याला ओल्ड गोवा पोलिस ठाण्यात आणण्यात आले असून, मंगळवारी मेरशी येथील न्यायालयात त्याला हजर करण्यात येणार आहे.

पोलिस सूत्रांनी सांगितले की, फसवणुकीच्या गुन्ह्याचे मूळ शोधणे, फसवलेली रक्कम परत मिळवणे आणि या फसवणूक रॅकेटमधील इतर सहभागींची ओळख पटवणे हे आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. पुढील तपास वेगाने सुरू आहे.

सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना, नागरिकांनी अशा प्रकारच्या कॉल्सपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.